**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१३४/२०१५</u>**
**<u>शासन वि. अंकुरकुमार व ईतर</u>**

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रकरण दहा वर्षे जुने आहे. अभियोग पक्षाने आरोपी क्र.३ च्या विरुध्द वेगळ्या संपरिक्षेदरम्यान साक्षीदारांना हजर केलेले नाही. पोलिसांनी आरोपी क्र.१ व २ यांचे वॉरंट बजावलेले नाही. सबब प्रकरणामध्ये प्रगती नाही. आरोपी क्र.३ हे विनाकारण प्रलंबित प्रकरणाला सामोरे जात आहेत आणि त्याद्वारे त्याच्या संवैधानिक अधिकाराचे हनन होत आहे. सबब अभियोग पक्षाने पुढील तारखेला सर्व साक्षीदारांना हजर ठेवावे अन्यथा उचित आदेश पारीत केला जाईल.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.30 17:40:42 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**
**दिनांक – ३०–०३–२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**देवणी.**